Publication: Kumar Kranti
Edition: Kolhapur
Page No: 4
Date: 10.10.16
Headline: 8 % increase in risk of heart diseases amongst youngsters in Ratnagiri

# रत्नागिरीत लठ्ठपणामुळे हृदयविषयक आजारांचा धोका ८ टक्क्यांनी वाढला

**रत्नागिरी :** जागतिक हृदय दिनाचे आयोजन विविध देशांमध्ये दर वर्षाच्या २९ सप्टेंबर रोजी केले जाते. जागतिक हृदय फाऊंडेशनकडून आयोजित केलाजाणारा हा एक जागतिक उपक्रम असून यावर्षी एका निरोगी हृदयाचे महत्त्व पटवून देऊन त्याला ताकदवान ठेवण्याचे महत्त्व समजून दिले जाणार आहे. लोकांनाहृदयविकारापासून दूर ठेवण्यासाठी जीवनशैलीत छोटे बदल करण्यासाठी जनतेला शिक्षित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

या दृष्टीकोनातून इंडस हेल्थ प्लसने एका अ‍ॅजबनॉर्मलिटी रिपोर्टचे प्रकाशन केले असून त्यातून हृदय विकाराचे वाढते प्रमाण दर्शवले जात आहे. या अभ्यासाचे नमुनाआकारमान १४,००० लोक होते. त्यांनी जानेवारी २०१५-ऑगस्ट २०१६ दरम्यान प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करून घेतली.

या अभ्यासातून हे सूचित केले गेले आहे की, ३५ ते ४५ टक्के युवा व्यक्ती हृदयविषयकआजारांपासून पीडित असल्याचे आढळून आले.